# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१०/२०१६

**१) संगनमत करुन संस्थेचे खोटे दस्ताऐवज तयार करुन खरे असल्याचे भासवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

सन २०१४ ते आज पावेतो दि. २१/१०/२०१४ धर्मदाय आयुक्त यांनी आरोपी क्र. २ ते ७ बाजुने निकाल दिला निकाला विरुध्द फिर्यादी व इतर विश्वस्त आरोपी क्र. ९ व १० मिळुन अपील क्र. ६८/१४ अन्वये मा. जिल्हासत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले तेथे त्यात मा. जिल्हा सत्र न्यायालय भंडारा यांनी दि. १५/०४/२०१५ रोजी धर्मदाय आयुक्ताचे निकालास स्थगीती दिली त्या विरुध्द आरोपी क्र. १ व २ यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपुर येथे रिटपीटीसन २७१४/१५ ला जैसे थे असा आदेश दिल्याने आरोपी क्र. १ ते १० यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपुर यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता समर्थ महाविद्यालयात अनाधीकृत प्रवेश करुन संस्थेचे बनावटी लेटर हेड तयार केले व फिर्यादी व इतर २ विश्वतांची कोणतीही परवानगी न घेता लेटर हेड वर नावे छापुन आरोपी क्र. २ यांनी स्वत:ला संस्थेचा अध्यक्ष समजुन स्व:चे नावाचे सिक्के तयार केले व इतर संस्थेच्या नावाचा गैरवापर केला व इतर आरोपीतांनी संगनमत करुन संस्थेच नावाचे खोटे दस्ताऐवज तयार केले व ते खरे असल्याचे भासवुन वापर करीत फिर्यादी ओमेश्वर रुपचंदजी रोकडे वय ५५ वर्ष, रा. लाखनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२०,४०६,४२१,४४७,४६८,४७१,४७२,४७६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चकाटे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक २९/१०/०१६ रोजी ००.४५ वा. दरम्यान आरोपी चालकाने पल्सर बिना नंबरची त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेत झिकझ्याक पध्दतीने भरधाव वेगाने इंदीरा चौक मोहाडी येथे चालवितांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निरगुडे पोस्टे मोहाडी यांचे व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १८४,१८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. धांडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक २८/१०/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीस काही कारण नसतांनी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) विदयुत करंट लागल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. ३०/१०/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील मृतक बिनकीलाल छबिलाल टेंभरे वय ४८ वर्ष, रा. मंगल कार्यालयाचे मागे लाखनी हा घरी स्लॅपवर बांधलेली सिरीज लाईटची दुरुस्ती करीत असतांना अचानक विदयुत करंट लागुन मरण पावल्याने फिर्यादी विजय दुर्याधन बिसने रा. केसलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) विषारी औषध प्राशन करुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. ३०/१०/२०१६ रोजी ०९.३० ते १५.३० वा. दर. यातील मृतक लक्ष्मण बाजीराव बर्वे वय ६२ वर्ष, रा. रोहा यांचे वडील यांनी घरी कोणीही हजर नातांना त्याच्यावर असलेल्या कर्जामुळे कोणतेतरी विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याने फिर्यादी पुरुषोत्तम लक्ष्मण बर्वे वय ३० वर्ष, रा. रोहा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक.२७/१०/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील मृतक आम्माराम नत्थु लांजेवार वय ७५ वर्ष, रा. झाडगाव याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे दि. २७/१०/२०१६ चे ०८.३० वा. दर. भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ.मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पो. स्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चांदेवार पो. स्टे. साकोली यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सोकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ३८ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व ईतर वाहनांवरती ३३ केसेस करण्यात आलेल्या आहेत

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.